प्रेसनोट दि.१७/०४/२०२३

**सागर गुणवंत गोळे, मोजणीदार, चंदगड लघु पाटबंधारे शाखा क्र.१ चंदगड(जलसंपदा विभाग), ता.चंदगड,जि. कोल्हापूर यांनी लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

यातील तकारदार यांनी त्यांचे कोवाड ता.चंदगड,जि.कोल्हापूर येथील शेतीकरीता ताम्रपर्णी नदीकाठी विदयुत उपसा यंत्र बसविणेस परवानगी मिळणेबाबत चंदगड लघु पाटबंधारे शाखा क्र.१ चंदगड(जलसंपदा विभाग),ता.चंदगड,जि.कोल्हापूर कार्यालयाकडे अर्ज सादर केला होता.

सदर अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार हे चंदगड लघु पाटबंधारे शाखा क्र.१ चंदगड(जलसंपदा विभाग),ता. चंदगड,जि.कोल्हापूर या कार्यालयातील संबंधीत काम पहाणारे मोजणीदार श्री. गोळे यांना ४ दिवसापूर्वी जावुन भेटले असता मोजणीदार गोळे यांनी तकारदार यांचे शेतीकरीता ताम्रपर्णी नदीकाठी विदयुत उपसा यंत्र बसविणेस परवानगी देणेसाठी तकारदार यांचेकडे ८,५००/- रुपये लाचेची मागणी करून त्यापैकी ३०००/-रू लागलीच स्विकारले व उर्वरीत रक्कम ५,५००/-रू. चार दिवसात घेवून येण्यास सांगीतले. त्याबाबत तकारदार यांनी दिनांक १७/०४/२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालया कडे मोजणीदार श्री. गोळे यांचे विरुध्द तकारी अर्ज दिलेला आहे.

तकारदार यांचे तकारी प्रमाणे आज दिनांक १७/०४/२०२३ रोजी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष मोजणीदार श्री. गोळे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणी मध्ये मोजणीदार श्री. गोळे यांनी तकारदार यांना त्यांचे शेतीकरीता ताम्रपर्णी नदीकाठी विदयुत उपसा यंत्र बसविणेस परवानगी देणे करीता तडजोडीअंती ५,०००/- रुपये लाचेची मागणी केलेचे निष्पन्न झाले. त्यानंतर मोजणीदार श्री. सागर गोळे यांचे विरुध्द त्यांचे कार्यालया मध्ये सापळा आयोजित केला असता मोजणीदार श्री. सागर गोळे यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारा समक्ष ५,०००/-रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद करणेची प्रकीया सुरु आहे.

सदर कारवाई मा.श्री.अमोल तांबे पोलीस उप आयुक्त / पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,पुणे, मा. श्री.सुरज गुरव अपर पोलीस उप आयुक्त / अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,पुणे, श्री.सरदार नाळे ,पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.नितीन कुंभार ,पोलीस निरीक्षक, पोउपनि संजीव बंबरगेकर, सहा.फौजदार भंडारे,पोलीस नाईक सुधीर पाटील, पोना सचिन पाटील, पोकॉ मयुर देसाई व चालक पोहेकॉ विष्णु गुरव, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे परिक्षेत्र,पुणे**
**दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**

**३) श्री.सरदार नाळे , पो.उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर:-९६७३५०६५५५**
**०२३१/२५४०९८९**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**